दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १४५ वा मंगळवार दि.१९ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

रेणापूर येथे महायुतीचे आ. कराड यांच्या प्रचारार्थ अभूतपुर्व रॅली

# देशमुखशाही संपविण्यासाठी परिवर्तनाच्या लढाईत सहभागी व्हा- आ. रमेशआप्पा कराड





लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आ रमेशआप्पा कराड यांच्या प्रचारार्थ सोमवारी सकाळी भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत रेणापूर शहरातून अभूतपूर्व प्रचार रॅली काढण्यात आली या रॅलीत प्रचंड मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. रॅलीचा समारोप जाहीर सभेत झाला. या सभेत बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, काँग्रेस विरुद्ध प्रचंड असंतोषाची लाट निर्माण झाली आहे यावेळेस बदल घडवण्याचा आणि परिवर्तन करण्याचा निर्णय जनतेने घेतल्याने महायुतीचा विजय हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. तेव्हा मतदार संघातील देशमुखशाही संपवण्यासाठी परिवर्तनाच्या लढाईत सर्वांनी सहभागी होऊन निर्भयपणे मतदान करावे आणि कमळ चिन्ह समोरील बटन दाबून मला आशीर्वाद द्यावेत आणि काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचारार्थ सोमवारी रेणापूर येथे मोठया उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात अभूतपुर्व प्रचार रॅली काढण्यात आली. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून ऋषिकेशदादा कराड यांच्या प्रचार पद यात्रेला प्रारंभ झाला. सदरील रॅली सराय मोहल्ला, बसवेश्वर चौक, लिंगायत गल्ली, एकुरके गल्ली, अमृतेश्वर चौक, धनगर गल्ली, साठे नगर, बौद्ध नगर, गाडे गल्ली, कातळे गल्ली, येलम गल्ली, शिंदे गल्ली मार्गे अभिषेक आकनगिरे यांच्या निवासस्थानासमोर रॅलीचा समारोप झाला. रॅली मार्गावर ठिकठिकाणी देव देवतांचे आशीर्वाद घेवून विविध महापुरुषांना अभिवादन करून मार्गस्थ झालेल्या या रॅलीत भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षातील महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते, मतदार, तरुण महायुतीच्या पक्षाचे ध्वज आणि फलक हातात घेऊन प्रचंड संख्येने सहभागी झाले होते. या अभूतपूर्व रॅलीत महिलांचा प्रचंड मोठा सहभाग दिसून आला. महायुतीचा विजय असो, रमेशआप्पा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, प्रवासी नको निवासी आमदार निवडा, भाजपाचा विजय असो, मत भूल कमल का फूल, ब्युटीफूल कमल का फुल, नका मारू थापा गप्पा.... निवडून येणार फक्त रमेशआप्पा यासह विविध घोषणांनी संपूर्ण रेणापूर शहर दणाणून सोडले होते. सहभागी झालेल्या प्रत्येकात प्रचंड उत्साह आणि जल्लोष दिसून येत होता. समारोपाच्या सभेसही हजारोचा जनसामुदाय उपस्थित होता. सभेला प्रचंड गर्दी झाल्याने अनेकांना आजूबाजूला थांबून महायुतीच्या मान्यवरांचे विचार ऐकावे लागले.यावेळी भाजपाचे नेते माजी सनदी अधिकारी शंकराप्पा भिसे, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंतराव जाधव, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, प्रा. संजय शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, अनिल भिसे, दशरथ सरवदे, अभिषेक आकनगिरे, बाबासाहेब घुले, महेंद्र गोडभरले, वसंत करमुडे, सतीश आंबेकर, भास्कर लहाने, राष्ट्रवादीचे विनोद आंबेकर, शिवसेनेचे रवी चव्हाण, रिपाईचे धम्मानंद घोडके, बायनाबाई साळवे, आरती राठोड, ललिता कांबळे, अनुसया फड, अमर चव्हाण, सूर्यकांत मोटेगावकर, जयप्रकाश हलकुडे, श्रीकृष्ण जाधव, सुकेश भंडारे, चंद्रकांत कातळे, शेख शफी, दिनकर राठोड, श्रीकृष्ण मोटेगावकर, सुधीर तोडकरी, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, संतोष चव्हाण, उज्वल कांबळे, विजय चव्हाण, उत्तम चव्हाण, राजू आलापुरे, महेश गाडे, अजय गुडे, श्रीमंत नागरगोजे, रमा चव्हाण, शेख शहेनशाह, नानासाहेब कसपटे यांच्यासह अनेकजण व्यासपीठावर होते. या सभेत हरिभाऊ भोळे, मनीषा मुंडे यांच्यासह पोहरेगाव आणि बावची येथील अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

# शांघाय नको,स्वच्छ सुंदर आणि सुरक्षित लातूर पाहिजे - डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर



**दहशत मोडून काढत लोकशाही स्थापनेसाठी साथ देण्याचे आवाहन**

लातूर/प्रतिनिधी:लातूरकरांना शांघाय नको आहे,त्यांना फक्त स्वच्छ,सुंदर आणि सुरक्षित लातूर पाहिजे.माझं लातूर पाहिजे,आपलं लातूर पाहिजे, आणि ते करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.आपण जिल्ह्यातील पहिली महिला आमदार म्हणून मला निवडून द्या. मी पाच वर्ष तुमची सेवा करीन, अशी भावनिक साद डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लातूरकरांना घातली.लातुरातील दहशत मोडून काढत लोकशाही स्थापन करण्यासाठी साथ देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सोमवारी भव्य पदयात्रेने डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचाराची सांगता झाली. यानिमित्त आयोजित सभेत डॉ. अर्चनाताई बोलत होत्या. मंचावर माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे,शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,माजी जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी,गुरुनाथ मगे, शिवसेनेचे जेष्ठ नेते ड.बळवंत जाधव,जिल्हाप्रमुख सचिन दाने, राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव ड.व्यंकट बेद्रे,युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर,महिला मोर्चाच्या रागिनीताई यादव,भाजपा अल्पसंख्यांक आघाडीचे मोहसीन शेख,शैलेश पाटील चाकूरकर,कुशाग्रसिंह,ड. दिग्विजय काथवटे,प्रशांत पाटील,दीपाताई गीते आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

डॉ.अर्चनाताई पाटील यांनी प्रचार मोहिमेत सहभागी घेणाऱ्या महायुतीतील प्रत्येक घटकाचे आभार मानले.विशेष करून लाडक्या बहिणी आणि प्रत्येक लातूरकर माझे स्टार प्रचारक आहेत.प्रचारासाठी काढलेल्या पदयात्रेच्या स्टर कँपेनर माझ्या लाडक्या बहिणी आहेत.आपण सर्वांनी माझ्यावर प्रेम केले,मला आशीर्वाद दिले.या प्रेमातून उतराई होणे शक्य नाही, असे ताई म्हणाल्या.

संपूर्ण लातूरकर माझा परिवार आहे. आपली जबाबदारी माझ्या खांद्यावर आहे. लातुरातील दहशत मोडून काढत इथे लोकशाही आणायची आहे. या निवडणुकीतून महायुतीचा लातूर पॅटर्न घडवू.१९९५ मध्ये शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी लातूर पॅटर्न घडवला होता. आता २०२४ मध्ये नवीन अध्याय लिहिला जाणार आहे.या परिवर्तनाचे आपण साक्षीदार आहात,असे ताई म्हणाल्या.

# ना. संजय बनसोडे यांनी साधला व्यापाऱ्यांशी संवाद गेल्या १० वर्षापासून ना.बनसोडे यांचा व्यापाऱ्यांशी स्नेह कायम



उदगीर / प्रतिनिधी :- उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांनी निवडणुकीच्या प्रचारार्थ शहरातील व्यापारी बांधवाशी संवाद साधला. उदगीर येथील व्यापारी महासंघ, संघर्ष मित्र मंडळ, श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ यांच्या वतीने आयोजित संवाद बैठकीत बोलताना ना. संजय बनसोडे यांनी उदगीरच्या विकासामध्ये व्यापाऱ्यांचे मोठे योगदान राहिले आहे. शहरातील व्यापार हा अधिक वृद्धिंगत व्हावा, येथील उद्योगांना अधिक चालना मिळावी याकरिता मी कायम प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगून आगामी काळात उदगीरच्या बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा व शहरातील उद्योजकांना उद्योग करण्याची संधी मिळावी यासाठी सर्व सोयींनी युक्त अशी एम .आय. डी. सी सुरू करण्यात येईल अशी ग्वाही ना. बनसोडे यांनी दिली. येथील संघर्ष मित्रमंडळ व श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ हे माझ्यासाठी 'लकी' असून आगामी काळातही आपण सर्वांनी उदगीरच्या विकासासाठी माझ्या पाठीशी उभे रहावे असे आवाहन ना. बनसोडे यांनी केले.यावेळी जहीराबादचे माजी खा.बी.बी. पाटील, माजी आ.गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, बस्वराज बागबंदे, माजी जि. प. अध्यक्ष राहुल केंद्रे, रामचंद्र तिरुके, भरत चामले, भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, उद्योजक रमेश अंबरखाने, रामराव बिरादार धनाजी मुळे, बस्वराज पाटील कौळखेडकर,धनाजी वाकुडे, सागर महाजन, सुरेंद्र आकनगिरे , अमोल पाटील, आदी उपस्थित होते. यावेळी विविध व्यापारी संघटनांनी ना. संजय बनसोडे यांना जाहीर पाठींबा दिला. या बैठकीस रामदास जळकोटे, अनिल मेंगा, विजय मांगुळकर, नारायण वाकुडे, प्रशांत मांगुळकर, मोतीलाल डोईजोडे, अविनाश रायचुरकर, रतीकांत अंबेसंगे, चंद्रकांत पाटील कौळखेडकर, भास्कर पाटील, अनिल पुदाले, महादेव स्वामी, शंकरराव लासुने, अनुप मांगुळकर, गोपाळ पाटील, संतोष फुलारी, गजानन चिद्रेवार, कमलेश पेठे, जगदीश चोधरी, अमोल अनकल्ळे यांच्यासह शहरातील व्यापारी उपस्थित होते.

# काँग्रेसच्या रॅलीला 'लय भारी' प्रतिसाद; रितेश देशमुखांची हजेरी, तरुणाईत उत्साह

**अमित देशमुख यांनी सांगता सभेत घेतला विरोधकांना चिमटा, शांत आणि सुरक्षित लातूरसाठी मतदान करण्याचे केले आवाहन**



लातूर/प्रतिनिधी :-प्रचाराचा शेवटचा दिवस काँग्रेस-महाविकास आघाडीच्या रॅलीने गाजला. लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अभिनेते रितेश देशमुख यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्ते, मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. सुमारे तीन तास चाललेल्या या रॅलीत युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जागोजागी आमदार अमित देशमुख, रितेश देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे यांचा पुष्पहार खालून आणि फुलांचा वर्षाव करुन स्वागत करण्यात येत होते. अमित देशमुख आणि रितेश देशमुख हे नम्रतेने प्रत्येक व्यक्तीचे अभिवादन स्वीकारताना दिसले. यावेळी आमदार अमित देशमुख आणि रितेश देशमुख यांनी भाषण करुन रॅलीची सांगता हनुमान चौकात केली. या रॅलीत खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी खासदार सुधाकर श्रंगारे, माजी महापौर दीपक सुळ, माजी महापौर स्मिता खानापुरे, लातूर शहर-जिल्हा अध्यक्ष अॅड. किरण जाधव, अॅड. उदय गवारे आदींसहपक्षाचेपदाधिकारी,कार्यकर्तेमोठ्यासंख्येनेउपस्थितहोते. रॅलीची सुरुवात हनुमान चौक येथून झाली. पुढे रॅली हनुमान चौक-अक्षता-कापड लाईन,गोलाई (किंग कॉर्नर) -भुसार लाईन-सुभाष चौक (लोखंडे तेल दुकान), सुभाष चौक-अलंकार टॉकीज-जुनी कापड लाईन गंजगोलाई, गंजगोलाई मस्जिद रोड-साळे गल्ली-पॉवर हाऊस मागे-अण्णा भाऊ साठे चौक, अण्णा भाऊ साठे चौक- गंजगोलाई-छत्रपती शिवाजी महाराज रोड-सोना सेल्स, सोना सेल्स-गुळ मार्केट चौक, गुळ मार्केट चौक सराफ लाईन रोड- गंजगोलाई, गंजगोलाई-लोखंड गल्ली मधून कामदार रोड, कामदार रोड-हनुमान चौक येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. प्रमुख नेत्यांच्या भाषणानंतर प्रचाराची सांगता झाली. लातूरकरांना विजयाचा चौकार मारायचा आहे हे सांगत असताना आमदार अमित देशमुख यांनी काँग्रेसच्या पंचसूत्री कार्यक्रमाची माहिती उपस्थितांना दिली. आगामी काळात गंजगोलाईसाठी मास्टर प्लॅन करायचा आहे. लातूरचा विकास काँग्रेसने केला आहे. इतर कुठल्याही पक्षाने लातूरचा विकास केलेला नाही. लातूर काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. काँग्रेस पक्षाशिवाय तुम्ही कोणालाच मतदान केलेले नाही. या महायुतीने महाराष्ट्राचे, लातूरचे वाटोळे केले आहे. लातूरमध्ये भ्रष्टाचार वाढला, गुंडगिरी वाढली, अवैध धंदे वाढले, दलालांचा सुळसुळाट वाढला आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. अभिनेते रितेश देशमुख यांनी आमदार अमित देशमुख यांना प्रचंड मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन उपस्थितांना केले. यापूर्वी लातूरकरांनी लातूरचे नेतृत्व निवडून दिले. त्यानंतर ते मराठवाड्याचे नेते झाले. आता यापुढे ते महाराष्ट्राचे नेतृत्त्व करणार आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त मतदान करण्याची काळजी घ्या. लातूरचा बिग बॉस तुमच्या प्रेमामुळे महाराष्ट्राचे नेतृत्त्व करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. मतदानापूर्वी ट्रॅक रेकॉर्ड, बॅकग्राऊंड आणि मेरिट पाहा लातूरकरांनी उमेदवाराचा ट्रॅक रेकॉर्ड, बॅकग्राऊंड आणि मेरिट पाहून मतदान करावे असे आवाहन आमदार अमित देशमुख यांनी केले. काँग्रेसच्या विरोधात जे उमेदवार उभे आहेत ते जामिनावर बाहेर आहेत, असा टोला त्यांनी लगावला. विरोधकांनी लुबाडले, फसवले, धमकावले, लुटले पण काँग्रेसने अशी कामे कधीच केली नाहीत. आता अशा प्रवृत्ती लातूरमध्ये वाढीस येणार नाहीत, याची खबरदारी प्रत्येकाने बाळगली पाहिजे. लातूरची संस्कृती स्वच्छ, पारदर्शक आणि कायद्याच्या चौकटीत असणारी ही संस्कृती असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले. जिथे विषय गंभीर तिथे अमित देशमुख खंबीर असेही ते म्हणाले. 'लातूर अजेंडा २०२४-२९' चे हनुमान चौकात प्रकाशन यावेळी आमदार अमित देशमुख, अभिनेते रितेश देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि माजी खासदार सुधाकर शृंगारे यांच्या हस्ते वर्ष २०२४-२९ या येणाऱ्या पाच वर्षांसाठी लातूरसाठीचा 'लातूर अजेंडा २०२४-२९' हा वचननामा प्रकाशित करण्यात आला. लातूरकरांच्या सूचनांचा यात समावेश करण्यात आल्याची माहिती आमदार अमित देशमुख यांनी दिली. येत्या पाच वर्षात हा वचननामा पूर्ण करणार असल्याचे त्यांनी म्हटले.

## संपादकीय....

# वेळीच आवरा

वास्तवात सातत्याने अन्याय होत असताना आणि त्याच्या निवारणासाठी शासनव्यवस्थेत अर्ज-विनंत्या करूनही काही उपयोग होत नाही. कोर्टाची पायरी चढावीशी वाटत नाही आणि चढली, तरी वर्षानुवर्षे न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागते. न्याय मिळालाच तर तो अपवादाने. न्यायप्रक्रियेच्या या मर्यादांचा गैरफायदा उठवत समांतर व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न अनेक राज्यांत झालेला दिसतो. त्यातही या सर्वच ठिकाणी राजकारण शिरलेले दिसते. सवंग लोकप्रियतेसाठी या मार्गाचा बिनदिक्कतपणे अवलंब तर केला जातोच; त्यात कोणाच्या जीवाची पर्वाही केली जात नाही, असे दिसते. केवळ उत्तर प्रदेशच नव्हे आसाम, पश्चिम बंगालसह राजस्थान, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, झारखंडसह देशभरात अनेक ठिकाणी या प्रकारच्या घटना घडल्या. मात्र कोणत्याही मालमत्ता पूर्वसूचनेशिवाय पाडता येणार नाहीत आणि ज्याच्या विरुद्ध कारवाई केली जात आहे, अशा व्यक्तीस कारवाईच्या आधी नोटीस द्यावी, नोटिशीला उत्तर देण्यासाठी १५ दिवसांचा अवधी देणे आवश्यक असल्याचा महत्त्वाचा निर्णय सुप्रीम कोर्टाने नुकताच दिला. कायद्याचा गैरवापर करणार्यांना त्याने ब्रेक लागला आहे, कारवाईला बळी पडलेल्यांना या निर्णयाने दिलासाही मिळणार आहे. घरे मनमानी पद्धतीने पाडली जात असून काही प्रकरणांत कुटुंबीयांनाही पोलिस कोठडीत ठेवण्यात आल्याच्या घटना घडल्या. अशाप्रकारे कायदा हातात घेणार्या सरकारी अधिकार्यांना या गंभीर कृत्यासाठी दोषी धरले पाहिजे, असेही कोर्टाने म्हटले आहे. राजकारणी सोयीने कायद्याचा अर्थ लावत असले तरी खरी जबाबदारी कायद्याचे रक्षण करणार्या प्रशासनाची आणि ते राबवणार्या अधिकार्यांची असते, हेच सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्टपणे सांगत त्यांचे कान धरले!

उत्तर प्रदेश पाठोपाठ राजस्थान व मध्य प्रदेशातही अशाप्रकारे गुन्ह्याचे आरोप असणार्या व्यक्तींच्या घरावर राज्य सरकारकडून कारवाई करण्यात आली. राजकीय नेते सवंग लोकप्रियतेसाठी, स्थानिक वर्चस्वासाठी या प्रकारची कारवाई करताना दिसतात. खरे तर घर हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार. म्हणूनच एखाद्या निर्दोष व्यक्तीला त्याच्या घरापासून वंचित ठेवणे बेकायदेशीर आहे. न्यायालयाच्या या निर्णयाला मानवी पैलूही आहे. केवळ आरोपी आहे, म्हणून घर पाडता येणार नाही. खटला चालवल्याशिवाय कोणालाही दोषी ठरवता येणार नाही. मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्यास तो न्यायालयाचा अवमान ठरेल, असे सुप्रीम कोर्टाने रास्तपणे खडसावले. थोडक्यात राज्य सरकारचे अधिकारी न्यायाधीशाप्रमाणे एखाद्या व्यक्तीला आरोपी किंवा निर्दोष ठरवू शकत नाहीत आणि शिक्षा म्हणून अशा व्यक्तीचे घर पाडू शकत नाहीत. ते काम न्यायालयाने करायचे आहे, प्रशासनाने नव्हे, असे कोर्टाने बजावले. वेगवेगळ्या आंदोलनांत व निदर्शनांत सरकारी मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते हे खरे. शासकीय मालमत्तेचे नुकसान करणे हा गुन्हाच. मात्र तो सिद्ध होण्यापूर्वीच या पापाबद्दल त्यांची घरेच जमीनदोस्त करणे, हा न्याय नव्हे. म्हणजेच सरकारी झुंडशाही खपवून घेतली जाणार नाही, असेच सुप्रीम कोर्टाने एकप्रकारे स्पष्ट केले. मुळात आपल्याकडे बेकायदेशीर झोपडपट्ट्याही पावसात पाडू नयेत, असे नियम आहेत. बांधकाम पाडण्याची कारवाई करतानाही त्याविरुद्ध अपील करण्यास वेळ दिला जावा, तसेच बेकायदा बांधकाम पाडण्याचे आदेश दिल्यानंतर त्या व्यक्तीला पंधरा दिवसांची मुदत द्यावी, अशी मार्गदर्शक तत्त्वे कोर्टाने सुनिश्चित केली आहेत. आता या तत्त्वांची तरी अंमलबजावणी होईल, अशी आशा आहे.

एकेकाळी एन्काऊंटर स्पेशॅलिस्ट पोलिस अधिकार्यांचे प्रकरण चांगलेच गाजले. त्यापैकी काही अधिकारी भ्रष्ट असल्याचे सिद्ध झाले आणि तेव्हाही कोर्टाने पोलिसांनी बनावट चकमकी करून गुन्हेगारांना ठार मारल्याबद्दल ताशेरे मारले होते. गुंडांचा समाचार घेण्याच्या नावाखाली त्यांच्या घरांवर बुलडोझर फिरवण्याची पद्धत सुरू झाली आहे. गुन्हेगाराची शिक्षा त्याच्या कुटुंबातील इतरांना दिली जाते आहे. याला 'समांतर न्यायव्यवस्था' असे म्हणावे लागेल. अशा कारवाईमुळे गुन्हेगारांच्या मनात भीती निर्माण होईल आणि ते पुन्हा गुन्हा करणार नाहीत, असा युक्तिवाद केला जातो. पण त्याला अर्थ नाही. जलद न्याय आणि कार्यक्षम प्रशासन याच्या नावाखाली अशा कारवाईचे कोणीही समर्थन करता कामा नये. ही बेकायदा कृत्ये करणारे फोफावत आहेत आणि कायद्याचा वचक कमी पडतो आहे, हे वास्तव आहे. त्यामुळे सुप्रीम कोर्टाचा निकाल स्वागतार्ह असला, तरी दुसरी बाजू लक्षात घेतली पाहिजे. अवैधरीत्या भूखंड हडपणे, त्यावर बेकायदा वस्त्या तयार करणे आणि सामाजिक अस्थिरता निर्माण होईल, अशा संघटित कृत्यांचा कट रचणे, ती घडवून आणणे यांसारख्या घटनांवर पायबंद घालण्यात राज्य सरकारे कमी पडत आहेत.

मुळातच अतिक्रमणे होऊच दिली नाहीत, त्यावर योग्यवेळी कारवाईचा बडगा उगारला तर दुखणे वाढत नाही. प्रशासनातील काही वर्ग पैशाच्या मागे लागून अशा अवैध कृत्यांना संरक्षण देतो, हे सरकारी अकार्यक्षमतेचेच द्योतक आहे. अप्रत्यक्षपणे अशा अवैध कृत्यांना संरक्षण देण्याचाच तो प्रकार असून तो तितकाच गंभीर आणि सामाजिक स्वास्थ्यास हानी पोहोचवणारा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यास कायद्याने वेळीच आळा घातला गेल्यास ही वेळ येणार नाही. आतापर्यंत या प्रकारात झालेल्या कारवाईत अनेकांची घरे व व्यवसाय उद्ध्वस्त झाले आहेत. अशाप्रकारे कृती व वक्तव्य करणार्यांच्या विरोधात स्वतःहून कारवाई करावी, असे आदेश कोर्टाने सर्व राज्यांना दिले आहेत. पण त्याचा कोणताही परिणाम झालेला दिसत नाही. आता ज्यांची घरे पाडण्यात आलेली आहेत, त्या सर्वांना नुकसानभरपाई देण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. ते देताना आपला रामशास्त्री बाणा दाखवला असला, तरीही स्थानिक नगरसेवक आणि पोलिस व पालिका अधिकारी यांना रोखणार कोण आणि कसे? या प्रत्येक बाबतीत सामान्य माणूस न्यायालयात जाऊ शकत नाही. म्हणूनच नागरिकांवर अन्याय होणार नाही, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी राज्या-राज्यांतील सत्ताधार्यांवर येते, हे लक्षात घेतले पाहिजे.

# सामाजिक बांधिलकी जपणारा पुरुष प्रधान !!

**प्रविण बागडे**
**नागपूर भ्रमणध्वनी ९९२३६२०९१९**
---------------

आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा पुरुषांना तोंड द्यावे लागणाऱ्या अनेक समस्यांसाठी जागतिक जागरुकता दिन आहे, ज्यात पालकांचा अलिप्तपणा, अत्याचार, बेघरपणा, आत्महत्या आणि हिंसाचार यांचा समावेश आहे. दरवर्षी हा दिवस १९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. जेव्हा प्रत्येक दिवस पुरुषप्रधान मानला जाऊ शकतो तेव्हा पुरुषांना जागरुकता दिवसाची गरज कां आहे? असा प्रश्न अनेकांना पडेल. अधिकृत दिवसांमध्ये 'अंडरडॉग'ची कबुली दिली जाते आणि म्हणूनच हा नोव्हेंबरचा उत्सव भुवया उंचावत आहे. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे सर्व सहा स्तंभ'. मुलांचे आणि पुरुषांचे जीवन, कर्तृत्व आणि योगदान, विशेषत: राष्ट्र, संघ, समाज, समुदाय, कुटुंब, विवाह आणि बालसंगोपन यातील त्यांच्या योगदानाबद्दल साजरे करण्याचा हा एक प्रसंग आहे.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची उद्दिष्टे सकारात्मक पुरुष आदर्शांना प्रोत्साहन देण्यासाठी; केवळ सिनेतारक आणि क्रीडापुरुषच नव्हे तर दैनंदिन, श्रमिक वर्गातील पुरुष जे सभ्य, प्रामाणिक जीवन जगत आहेत. समाज, समुदाय, कुटुंब, विवाह, मुलांची काळजी आणि पर्यावरणात पुरुषांचे सकारात्मक योगदान साजरे करण्यासाठी, पुरुषांच्या आरोग्यावर आणि आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी: सामाजिक, भावनिक, शारीरिक आणि आध्यात्मिक, सामाजिक सेवा, सामाजिक दृष्टीकोन आणि अपेक्षा आणि कायदा या क्षेत्रांमध्ये पुरुषांवरील भेदभाव हायलाइट करण्यासाठी, लैंगिक संबंध सुधारण्यासाठी आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी, एक सुरक्षित, उत्तम जग निर्माण करण्यासाठी, जिथे लोक सुरक्षित राहू शकतील आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचू शकतील.

जरी आंतरराष्ट्रीय पुरुष आणि महिला दिन हे 'लिंग-केंद्रित' कार्यक्रम मानले जात असले तरी ते वैचारिक आरशातील प्रतिमा नाहीत कारण ते पुरुष किंवा स्त्रियांसाठी अद्वितीय मानल्या जाणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकतात. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा इतिहास प्रामुख्याने पुरुष आणि मुलांच्या अनुभवांसाठी अनन्य समजल्या जाणाऱ्या समस्यांशी संबंधित आहे, तसेच सकारात्मक रोल मॉडेल्सवर भर दिला जातो, जे विशेषत: 'सामाजिक संदर्भात आवश्यक मानले जाते जे सहसा पुरुषांच्या प्रतिमांनी आकर्षित होते. वाईट वागणे, सकारात्मक पुरुष रोल मॉडेल्स हायलाइट करताना आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा हे दाखवण्याचा प्रयत्न करते की सर्व वयोगटातील पुरुष सकारात्मक रोल मॉडेल्सपेक्षा जास्त उत्साही प्रतिसाद देतात ते नकारात्मक स्टिरिओटाइपिंग करतात.' इतर पुरुष हक्क कार्यकर्त्यांनी आयएमडीच्या निमित्ताने प्रश्न विचारले, कौटुंबिक हिंसाचार आणि मुलांचा ताबा या कायद्यांमध्ये लैंगिक तटस्थतेच्या अभावावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ऑल इंडिया मेन्स वेल्फेअर असोसिएशनच्या चेन्नई चॅप्टरने आयएमडी २०१४ वर सरकारला एक निवेदन सादर केले होते, ज्यामध्ये पुरुष कल्याण मंत्रालय, राष्ट्रीय पुरुष आयोग स्थापन करण्याची आणि सर्व कायदे लिंग तटस्थ बनविण्याची मागणी केली.

थॉमस ओस्टर यांनी ७ फेब्रुवारी १९९२ रोजी उद्घाटन केले, आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या प्रकल्पाची संकल्पना एक वर्षापूर्वी म्हणजे ८ फेब्रुवारी १९९१ रोजी करण्यात आली. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा सर्वात जास्त काळ चालणारा उत्सव माल्टा आहे, जेथे ७ फेब्रुवारी १९९४ पासून घटना घडल्या आहेत. माल्टा हा एकमेव देश होता ज्याने फेब्रुवारीची तारीख साजरी केली आणि समाजातील त्यांचे योगदान, माल्टीज ए.एम. आर. समितीने २००९ मध्ये आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची तारीख १९ नोव्हेंबर वर हलवण्यासाठी मतदान केले. जेरोम तेलुकसिंग, ज्याने या कार्यक्रमाचे पुनरुज्जीवन केले, त्याने १९ नोव्हेंबर हा दिवस आपल्या वडिलांच्या वाढदिवसाच्या सन्मानासाठी निवडला आणि त्या तारखेला १९८९ मध्ये त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या फुटबॉल संघाने विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र होण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनी देशाला कसे एकत्र केले ते साजरे करण्यासाठी. तेलुक्सिंग यांनी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा केवळ लिंगनिहाय दिवस म्हणून नव्हे तर पुरुष आणि मुले यांना प्रभावित करणाऱ्या सर्व समस्यांवर उपाय म्हणून प्रचार केला आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन आणि त्याच्या तळागाळातील कार्यकर्त्यांबद्दल म्हटले आहे, 'ते लैंगिक समानतेसाठी प्रयत्नशील आहेत आणि आपल्या समाजातील नकारात्मक प्रतिमा आणि पुरुषांशी संबंधित कलंक दूर करण्याचा संयमाने प्रयत्न करत आहेत'.

भारतातील आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची चा उद्घाटन सोहळा १९ नोव्हेंबर २००७ रोजी अग्रगण्य भारतीय पुरुष हक्क संस्था इंडियन फॅमिली द्वारे आयोजित करण्यात आला होता. १९ नोव्हेंबर ही तारीख ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज या वस्तुस्थितीवर आधारित स्वीकारण्यात आली होती. त्या तारखेला आधीच आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे निरीक्षण करत होते. २००८ मध्ये भारतात हा कार्यक्रम पुन्हा साजरा करण्यात आला आणि दरवर्षी हा उत्सव सुरू ठेवण्याची योजना आखण्यात आली. २००९ मध्ये भारताला आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे पहिले कॉर्पोरेट प्रायोजकत्व प्राप्त झाले, ज्यामध्ये पुरूषवेअर ब्रँड लन सॉलीने आंतरराष्ट्रीय पुरुष दिनावर प्रचारात्मक ऑफर तयार करण्याचा निर्णय घेतला आणि होम बॉक्स ऑफिसने १९ नोव्हेंबर रोजी त्याच्या 'मेन इन ब्लॅक' मालिकेत पुरुष-पॉझिटिव्ह चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला. २०१४ मध्ये कॉन्फिडेअर एज्युकेशन कन्सल्टन्सीने नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय पुरुष दिनावर आर्ट गॅलरी आयोजित केली होती, तर कोलकाता येथे पुरुषांचे हक्क आणि वृद्धांच्या गैरवापरावर प्रकाश टाकण्यासाठी निदर्शने करण्यात आली होती.

२०१८ मध्ये पुरुषांसाठी एक कल्याणकारी आणि धर्मादाय ट्रस्ट, कायद्यातील लैंगिक तटस्थता, भारतातील पुरुष आयोग, भारतीय दंड संहितेचे कलम ४९८ (ए) रद्द करणे आणि बलात्कार कायद्याच्या गैरवापरावर कठोर कारवाई या मागण्यांसाठी कोलकाता येथे आंदोलन आयोजित केले. २०१९ मध्ये बंगळुरूच्या दोन प्रमुख रुग्णालये, एस्टर हॉस्पीटल्स आणि रिगल हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रोस्टेट कर्करोगाच्या जनजागृतीवर 'हेल्दी हिम' मोहीम राबवली. २०१७ आणि २०१८ मध्ये इतर अनेक जनजागृती उपक्रमांबरोबरच, स्वयंसेवकांनी नंदी हिल्स, भारत येथे बाईक रॅली काढली आणि ४०,००० हून अधिक लोक उपस्थित असलेल्या आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा केला. दामन वेल्फेअर सोसायटी अँड ट्रस्ट, सेव्ह इंडियन फॅमिली मूव्हमेंट अंतर्गत याच मुख्याध्यापकांवर काम करणारी आणखी एक प्रमुख एनजीओ देखील दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा करते. २०१९ मध्ये त्याने कानपूरमधील रेव्ह ३ मॉलमध्ये एक दिवसभर भव्य कार्यक्रम आयोजित केला आणि आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त जागरुकता निर्माण केली. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या विपरीत, आंतरराष्ट्रीय पुरुष दिन अधिकृतपणे संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे मान्यताप्राप्त नाही. सर्व पुरुषांना आज आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !

# सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे विधानसभा निवडणुकीत खूप लक्षवेधी प्रबोधन करीत आहेत.

समाजात जाऊन पक्ष बांधणी करण्यासाठी कोणी तयार नाही,मागासवर्गीय एस सी,एस टी इतर समाजाच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जनआंदोलने करण्यास कोणी तयार नाही,अन्याय अत्याचार,खून,बलत्कार,पुतळा विटंबना झाली की भावनिक जन आंदोलने तालुका,जिल्हा पातळीवर करून स्वताची व संघटनेची ओळख निर्माण करावी.यापलीकडे समस्या सोडविण्यासाठी कायमस्वरूपी उपाय योजना म्हणजे संघटना बांधणी करायची नाही.आणि ज्यांनी वेगवेगळ्या समाजात जाऊन समस्या समजून घेऊन संवाद साधला,एकूण कष्टकरी असंघटित वंचित समाजाला संघटित केले त्यातून स्वतःची ताकद उभी केली आणि जात दांडगे,धन दांडगे प्रस्थापित राजकीय घराणेशाहीला राजकीय ताकद दाखवून दिली.त्यांना आव्हान दिले.अशा नेत्यांना त्यांना सहकार्य करण्या ऐवजी हे हे अशक्य आहे,होऊच शकत नाही!.असे सांगणारे लिहणारे सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे विधानसभा निवडणुकीत खूप लक्षवेधी प्रबोधन करीत आहेत.हे बुद्धिजीवी विचारवंत संपादक आताच कसे जागृत झाले.सहा महिने वर्ष अगोदर आपले बौद्धिक कौशल्य दाखवून समाजात जाऊन जागृती का केली नाही. स्वतःच्या विचारधारेचा पक्ष मजबूत करण्यासाठी वेळ,बुद्धी,कष्ट,त्याग आणि पैसा का खर्च केला नाही. आपली ६ ते ९ टक्के मते ज्यांच्या बाजूने जातील त्यांचा विजय होणार असेल तर,प्रथम आपली झोपडी सुरक्षित करायला नको का?.दुसऱ्यांची घरे राजकीय आर्थिक दुष्टिने मजबूत करून समाजाला सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमच्यांना विधानसभा निवडणुकी नंतर बुद्धिजीवी विचारवंत संपादक मंडळीला काय मिळणार आहे. उद्या महाविकास आघाडीचे तीन वेगवेगळ्या पक्षाचे जातीचे उमेदवार निवडून आले तर ते सत्यनारायण महापूजा घातल्या शिवाय राहतील काय?.तेव्हा आपले सोन्याचे,चांदीचे स्टीलचे चमचे लक्षवेधी प्रबोधन करणारे बुद्धिजीवी विचारवंत संपादक मंडळी काय करतील?.

आपल्या नेतृत्वाला दुसर्या समाजाने मान्यता द्यायला पाहीजे. आपल्याला सशक्त नेतृत्व तयार करावे लागेल.जे लोकं आपले नेतृत्व करतात त्यांनीच आपली वोट बँक कमजोर केली आहे.वैचारिक विकास आणि परिवर्तन आपण सगळे मिळून घडवू शकतो. वेळ लागेल.पण आशावाद जीवंत राहील पाहिजे हे सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे बुद्धिजीवी विचारवंत संपादक मंडळी आशा वाद मारून टाकण्याचे काम करीत आहेत.एक कॉंग्रेस,एक भाजपा,दोन शिवसेना,दोन राष्ट्रवादी इतरांची राज्य पातळीवर पक्ष म्हणून मान्यता नाही त्याची सादी दाखल घेतली जात नाही.त्यात दखल पात्र समाज आणि त्याचा राजकीय पक्ष म्हणून लोकसभा,विधानसभेत एड प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी लक्षवेधी ठरत आहे.तिच्या बदल खोटा प्रचार करण्याचे काम सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे खूप बुद्धिजीवी विचारवंत,साहित्यिक, संपादक,लेखक,सेवानिवृत अधिकारी,सुरक्षित नोकरी करणारा आरक्षणचा लाभार्थी अशी मंडळी इमानदारीने करीत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुभवाने सांगितले होते.आपण आपल्या समाजाच्या भरवश्यावर? निवडणूक जिंकू शकत नाही.कुणीही उमेदवार आपल्या आपल्या समाजाच्या (जातीच्या) भरवश्यावर निवडणुका लढतो.समाजाचे १०० टक्के मत मिळतातच असे कधीही,कुठल्याही समाजामध्ये होत नाही,आपला समाज पण त्यातच मोडतो.कोणत्याही पक्षाचा नेता आपल्या समाजाच्या बरोबर इतर समाज जोडण्याचा प्रयत्न करतो.जो ह्या प्रयत्नात यशस्वी होतो तो जिंकतो. इतर समाज जोडण्यासाठी साम,दाम,दंड,भेद ही नीती वापरतो हे सर्वश्रुत आहे.आपल्या समाजाचे,महाराष्ट्रात बौद्ध व युपी मधे चांभार,जाटव आजच्या घडीला जे पक्ष जीव तोडून प्रयत्न करतात त्यात वंचित आणि बसपा आघाडीवर आहेत ह्यात वाद नसावा.हे पक्ष इतर जातीना जोडण्याचा प्रयत्न करतात भाईचारा निर्माण करतात.समस्या सोडविण्यासाठी वैचारिक प्रबोधन करून जन आंदोलन करतात.त्यामुळेच त्यांच्या सोबत विविध असंघटित कष्टकरी मजूर कामगार असलेला मागासवर्गीय,आदिवाशी,अल्पसंख्याक समाज जोडला जातो.त्यातूनच राजकीय शक्ति निर्माण होऊन राजकीय सत्ताधारी होण्याचे स्वप्न पडत असतात.

मान्यवर कांशीराम यांनी उत्तर भारतात जो होऊ शकते हे करून दाखवले.हा बसपाचा इतिहास सांगतो. त्यात ब्राम्हण,ओबीसी,मुस्लिम जोडल्या गेली होती. चार वेळा सत्ता मिळाली.निवडणूक लढवून जिंकल्या नंतर वेगवेगळ्या पक्षाशी युती आघाडी केली.त्यानंतर बहुजन समाजात विशेष उत्तर भारतातील एस सी चांभार,जाटव जातीत खोट्या नररेटिव्ह मधे फसवलय गेले.त्यातूनच बसपा नेतृत्व आणि कार्यकर्ते अजूनही बाहेर पडू शकले नाहीत.दुसरीकडे दुसऱ्या तिसऱ्या नंबरचे नेतृत्व होऊ दिले नाही. त्यांना कॉंग्रेस,भाजपने सामावून घेतले.कारण त्यांची मूळ जात दिशाहीन व सैरभैर केल्या गेली.आज ही परिस्थिति महाराष्ट्रातील बौद्धाची झाली आहे.प्रकाश आंबेडकर शिवाय इतर राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षाना समाज जवळ करत नाही. दुसऱ्या तिसऱ्या फळीतील नेत्यांना महायुती,महाविकास आघाडीचे नेतृत्व किंमत देत नाही. अशा वेळी सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे विधानसभा निवडणुकीत खूप लक्षवेधी प्रबोधन करीत आहेत बुद्धिजीवी विचारवंत,साहित्यिक,संपादक,लेखक,सेवानिवृत अधिकारी, सुरक्षित नोकरी करणारा आरक्षणचा लाभार्थी अशी मंडळी इमानदारीने बिनशर्थ महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन करीत आहे.

महाराष्ट्र राज्यात आरक्षणच्या मराठा ओबीसी आंदोलनात वंचित बहुजन आघाडी बनवली धनगरांनी. त्यांनी नेतृत्व करण्याची विनंती बाळासाहेब आंबेडकरांना केली. बाळासाहेब आंबेडकरांनी भारिप बहुजन महासंघाची युती वंचित सोबत केली. महाराष्ट्रातल्या असंख्य ओबीसी संघटना वंचित सोबत जोडल्या गेल्या.त्यात मुस्लिम ओबीसी च्या सुद्धा संघटना आहेत.असे हे समीकरण लोकसभा निवडणूक २०१९ मधे ४८ लाख मतापर्यंत पोहोचले होते.हा इतिहास निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत झाला आहे.नंतरच्या काळात नेहमी प्रमाणे खोटे नाररेटिव्ह पसरवून बौद्ध समाजाला फसविल्या गेले. बौद्ध समाजाचा वंचितचा तालुका जिल्हा पदाधिकारी प्रथम हाताशी धरून त्याला त्याच्या समाजाला फसविण्याचे काम दिल्या गेले ते त्याने इमानदारीने केले.म्हणूनच २०२४ मधे तो ग्राफ खाली आला.

आंबेडकरी विचारांच्या प्रत्येक नेत्याचा अभ्यास चांगला असतो.अन्याय,अत्याचारच्या घटनाचा,समस्याचा खूप मेहनत घेऊन तो प्रबोधन करतो पण परीक्षेत प्रत्येक वेळी नापास होतो.बाळासाहेब आंबेडकरांना हे माहित आहे कि,आपण आपल्या जातीच्या मतांवर आपण निवडून येऊ शकत नाही. पण बहुसंख्य मते जातीचे मतदार देतील व त्यात धनगर,ओबीसी,मुस्लिम,तृतीय पंथी व आता रयत मराठे ह्यांची पण मोठी फसगत झाली असल्यामुळे हे सगळे आरक्षणवादी वंचित एकत्र येऊ शकतात.लोकसभा निवडणुकी अगोदर मनोज जरांगे सोबत गरीब मराठा मोठ्या संख्येने संघटित होत होता. तो काही क्रांतिकारी बदल घडवेल ही अपेक्षा होती म्हणूनच प्रकाश आंबेडकर यांनी त्याला पाठिंबा दिला होता.पण तो ही एक मराठा लाख मराठा ५७ क्रांती मोर्च्या सारखा योग्यवेळी आपल्या सुवर्ण हिंदू जातीवर गेला.आणि सर्व गणिते मोडीत निघाले.कोणत्याही पक्षाला पाहिजे तेवढी त्यांची झळ पोचली नाही.

महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीत आता हाच प्रश्न उरतो समोर येत आहे.कि महाराष्ट्रातला बौद्ध (प्रकाश आंबेडकरांचा भरवश्याचा समाज) ह्या वेळेस ही खोट्या नररेटीव्ह मधे फसतो कि नाही? किंवा साम,दाम,दंड,भेद ह्यात विभागला जातो कि नाही?. म्हणूनच सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे बुद्धिजीवी विचारवंत,साहित्यिक, संपादक,लेखक,सेवानिवृत अधिकारी,सुरक्षित नोकरी करणारा आरक्षणचा लाभार्थी अशी मंडळी इमानदारीने बिनशर्थ महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन करीत आहे.यांना निवडणुकी नंतर धडा शिकविला पाहिजेच असे माझे व्यक्तिगत मत झाले आहे.हे पुणे करारातून तयार झालेले सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे विधानसभा निवडणुकीत खूप लक्षवेधी प्रबोधन करीत आहेत.बाकी छोटे छोटे चमचे महायुती महाविकास आघाडीने कधीचे फेकून दिले.त्यांची समाज पण दखल घेत नाही.विधान सभा निवडणूक एकच दिवस २० नोव्हेंबर २०२४ ला सकाळी ७ ते ६ वाजे पर्यन्त असणार आहे.आणि २३ नोव्हेंबर २०२४ ला महायुती आणि महाविकास आघाडी चा इतिहास लिहला जाईल,त्यात आंबेडकरी विचारांचा मतदार आणि त्याचा पक्ष कुठे होता आणि आहे हे निचचीतच लिहले जाईल. तेव्हा ही सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे विधानसभा निवडणुकीत खूप लक्षवेधी प्रबोधन करणारे बुद्धिजीवी विचारवंत,साहित्यिक,संपादक, लेखक,सेवानिवृत अधिकारी,सुरक्षित नोकरी करणारा आरक्षणचा लाभार्थी यांचे विश्लेषण,चिंतन परीक्षण लिहले जाईल. तेव्हा मतदान कोणाला करावे हा विचार आंबेडकरी विचारांच्या मतदारांनी गांभीर्याने करावा. त्यातूनच तुमचं संघर्षाचा लाचारीचा इतिहास लिहला जाणार आहे.

---------------------

**सागर रामभाऊ तायडे**
९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.

# श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी साधला संवाद संवाद बैठकीत महिलांचा उत्सपुर्त प्रतिसाद



लातूर / प्रतीनिधी :–शेतकजयांना त्यांच्या हक्काचा पीक विमा न मिळू देणाजया भाजपा महायुती सरकारचा दि. २० नोव्हेंबर रोजी महायुतीच्या विरोधात मतदान करुन शेतकरी, शेतमजूर आणि माता, भगिणींनी हिशेब करावा, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअमरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील कॉग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आमदार धिरज देशमुख यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील कानडी बोरगाव, रामेगाव, चिंचोली (ब), येथे दि. १८ नोव्हेबर रोजी आयोजित पदयात्रा व महिला सुसंवाद बैठकीत श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. याप्रसंगी सुनिताताई अरळीकर, लताताई काटे, आशाताई काटे, साधना मगर, सोनम देशमुख, भाग्यश्री देशमुख, धनंजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकजयांची आर्थिक उन्नती व जीवन व समृद्ध व्हावे यासाठी विलासरत्न विलासराव देशमुख व बब्रुवान काळे यांनी मांजरा कारखान्या बरोबरच मांजरा नदीवर जागोजागी बराज बांधून शेतक–यांचे आर्थिक परिस्थिती सुधावली आहे. त्यातून शेतकरी, कष्टकरी, मजूर आदीचे उत्पन्न वाढले आहे, असे श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या. २० नोव्हेंबर रोजी मतदान आहे. तमाम मतदार धिरज देशमुख यांना या दिवशी आशिर्वाद देणार आहेत, याची मला खात्री आहे, असे नमुद करुन श्रीमती वैशालीताई देशमुख पुढे म्हणाल्या, महायुती सरकारने मागील साडेसात वर्षात अनेक योजनांचा घोषणा केली, मात्र त्यांनी कुठलीच योजना राबवली नाही. मोदी यांच्या केंद्र सरकारनेही विदेशातील पैसा आणुन प्रत्येकांच्या बँक खात्यावर १५ लाख रुपये टाकण्याचे आश्वास दिले होते. सत्ता येताच त्यांनी आश्वासन सोडून दिले. युवकांनाही भूलथाप मारली. वर्षाला २ कोटी नोक–यांचे काय झाले, महिला सुरक्षा धोक्यात आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. युवक बेकार फिरत आहेत. कायदा व सुव्यवस्था राहिली नाही. भ्रष्टाचार प्रचंड प्रमाणात वाढला, शेतकजयांच्या शेतमालाला भाव नाही, शेतकरी अडचणीत आहेत. महायुतीचे सरकार मात्र मस्तवाल पणाने या सर्वच प्रश्नाकडे डोळे झाक करीत आहे. मतदारांनी बुधवारी धिरज देशमुख यांच्या नावापूढील हाताच्या चिन्हाचे बटन दाबून महायुती सरकारला जोरात झटका द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बबीता चव्हाण, तळाबाई राठेड, सरीताबाई चव्हाण, पुजा राठोड, वनिता चव्हाण, कांताबाई चव्हाण, धोंडाबाई जाधव, सारीका राठोड, सुरेखा राठोड, सुगरबाई राठोड, सुमनबाई राठोड, मिरा राठोड, जमुना आडे, यमुना चव्हाण, विमल जाधव, पुतळाबाई राठोड, स्नेहलताई देशमुख, शिलाताई मगर, कोमल मगर, साक्षी मगर, अनिता मगर, विमल मगर, मिना देशपांडे, कमल शिंदे, विजयमाला मगर, शोभा मगर, शिलाबाई मगर, आशा मगर, शिंधू मगर, सुचिता मगर, अश्विनी मगर, रागिणी आदमाने, सत्यभामा पिसाळ, अस्मिता शिंदे, मधुबाला वाघमारे, कमलबाई चौधरी, जयवंता चौधरी, वंदना घणगावकर, छाया घणगावकर, रमा घणगावकर, मनिषा सोनवणे, राधा ढवारे, वर्षाराणी कापसे, जयश्री घणगावकर, इंदुबाई कापसे, सोनु घणगावकर, प्रभावती जाधव, छाया माने, सुंदरबाई जाधव, रेणूका वाघमारे, लक्ष्मी घणगावकर, कौशल्या भंडगे, विमल भंडगे, गौळण सोनवणे यासह आदि महिला व कॉग्रेस पक्षाचे कार्यकते व गावकरी मंडळी उपस्थित होते.

## निलंगेकरांचा पुन्हा एकदा सुसंस्कृत पणाला कौल.. निलंगा मतदारसंघ राहणार जिल्ह्याच्या केंद्रस्थानी



निलंगा/प्रतिनिधी: विधानसभा निवडणुकीचा अनुषंगाने उडालेली प्रचाराची धुळवड,आरोप–प्रत्यारोपांची राळ,विकास कामांची उजळणी, नेत्यांचे दौरे यामुळे संपूर्ण मतदारसंघ गेले काही दिवस ढवळून निघाला.या निमित्ताने जिल्ह्याच्या राजकारणात निलंगा मतदारसंघ पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला.विशेष म्हणजे प्रचाराच्या सांगतेनंतर निलंगा मतदारसंघातील जनतेने पुन्हा एकदा सुसंस्कृत आणि संयमी राजकारणाला कौल दिला असल्याचे स्पष्ट झाले असून दि. २३ रोजी लागणाऱ्या निकालाची औपचारिकता बाकी असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

निलंगा विधानसभा मतदारसंघात निवडणूक जाहीर होण्याच्या पूर्वीपासून खरंतर प्रचार सुरू झाला होता. तिकिटाची खात्री असल्याने माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी प्रचाराला सुरुवातही केली होती. विरोधकांच्या उमेदवाराची घोषणा उमेदवारी अर्ज एक दिवस शिल्लक असताना झाली. त्यामुळे विरोधकांना तयारीसाठी फारसा वेळ मिळाला नाही. उमेदवाराची प्रतिमा आणि सुसंस्कृतपणा हा निलंगा मतदारसंघात या निवडणुकीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला.

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी मागील काळात केलेली विकासकामे,नागरिकांशी जपलेले नाते याचा मोठा प्रभाव जाणवला.गावोगावच्या नागरिकांसोबत असणारे वैयक्तिक संबंध आणि विकास कामांच्या अनुषंगाने जोडला गेलेला मतदार या आ. निलंगेकर यांच्यासाठी जमेच्या बाजु ठरल्या.

प्रचारादरम्यान विकासाचे मुद्दे मांडून अपप्रचाराला टाळणे ही बाबही महत्त्वाचे ठरली.आ. निलंगेकर यांनी मागील १० वर्षात केलेल्या कामांचा लेखालोखा सादर केला.त्याचा अपेक्षित परिणाम दिसून आला. विरोधकांकडे विकासाचे कसलेही मुद्दे नसताना त्यांनी मात्र अपप्रचारावर भर दिला. त्याला उत्तर म्हणून विकासकामे दाखवण्यात आली.असे मुद्दे या निवडणुकीत प्रभावी ठरले.

घरंदाज राजकारणी आणि पोरकट उमेदवार यांच्यात जनतेनेच तुलना केली.आ. निलंगेकर यांनी कुठेही,कधीही पातळी सोडली नाही.खालच्या पातळीवर टीका केली नाही. याच्यातून त्यांचा सुसंस्कृतपणा दिसून आला.

मतदारसंघात देशपातळीवरील नेत्यांच्या सभा झाल्या. राज्यातील व केंद्रातील मंत्री मतदारसंघात आले. प्रत्येकाने आ.निलंगेकर यांच्या कामाचे कौतुकच केले. राज्यपातळीवर नेतृत्व करण्यास आ.संभाजीराव पाटील सक्षम असल्याचे आणि निलंग्याचा लाल दिवा पक्का असल्याचा विश्वास त्यांनी दिला. आपल्या लोकप्रतिनिधीला मिळणारी ही शाबासकी निलंगेकर नागरिकांना सुखावून गेली.विशेषतः नितीन गडकरी यांनी केलेले भाषण निलंगेकरांची छाती अभिमानाने फुगवणारे ठरले.त्यामुळे प्रचाराची सांगता होत असताना निलंगेकर नागरिकांचा कौल कोणाकडे असेल ? हे स्पष्ट झाले.पुन्हा एकदा मंत्री होण्यासाठी आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनाच विजयी करण्याचा निर्धार जनतेने केला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## ज्यांचा कलर आणि कॉलर व्हाईट, विनोद खटकेंमुळे त्यांची हवा टाईट!

✻ कॉंग्रेस व भाजपच्या भुलथापांना बळी पडू नका, स्वाभिमानी व्हा

✻ वंचितचे उमेदवार विनोद खटके यांचे मतदारांना आवाहन



लातूर : ज्यांचा कलर आणि कॉलर व्हाईट, विनोद खटकेंमुळे झाली त्यांची हवा टाईट... अशा शब्दात विनोद खटकें यांनी आ. अमित देशमुखांचे नाव घेता डिवचले आणि त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका, गेल्या वर्षात कसल्याच प्रकारचा विकास केलेला नाही. पारंपरिक घराणेशाही मोडीत काढून मला मतपेटीतुन भरघोस आशीर्वाद द्या, असे आवाहन लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार विनोद खटकें यांनी प्रचाराच्या शेवटच्या समारोपिय सभेत केले. आज पर्यंत प्रस्थापित आमदारांना लातुरचा पाणी प्रश्न सोडवता आला नाही. ना उजनीचे, ना लिंबोटीचे पाणी आणता आले नाही. जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न निधी अभावी खितपत पडला आहे. शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. दर पाच वर्षांनी येऊन खोटी आश्वासनें दिली जातात. आणि तुमची मते घेतली जातात. आता त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका. मतपेटीतूनच त्यांची हुकूमशाही, घराणेशाही मोडीत काढा. असे आवाहन उमेदवार विनोद खटकें यांनी केले. यावेळी माजी नगरसेवक सचिन मस्के यांचे जोरदार भाषण झाले. प्रस्थापित आमदार गोंजारवान्या भाषेत धमक्या देत आहेत. असल्या धमक्याना आम्ही भीक घालत नसतो. २५ तारखेच्या आधीच २० तारखेला मतदारच मतपेटीतून त्यांना त्यांची जागा दाखवतील. वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर म्हणाल्या, निवडणूक जनतेने ताब्यात घेतली की काय होते, याचे प्रत्यक्ष चित्र लातूरमध्ये दिसते आहे. २० तारखेला संविधानाने दिलेल्या हक्काचा उत्सव आहे. मात्र वंचितच्या उमेदवारामुळे प्रस्तापित आमदार, सत्ताधाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळे धमक्या आणि हल्ले करू लागले आहेत. यावेळी मंचावर वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर, सौ. दीक्षाराणी विनोद खटकें, बौद्धाचार्य केशवराव कांबळे, महंमद शफी, मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड, संतोष सोमवंशी, जिल्हाध्यक्ष सलीमभाई सय्यद, महिला शहराध्यक्ष सुजाता अजनीकर, शहराध्यक्ष सचिन गायकवाड, अकाल सेनेचे गुलजीतसिंग जुन्नी, यशवंत बोरीकर, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ कोरडे, भारतीय बौद्ध महा सभेचे जिल्हाध्यक्ष एम. एम. बलांडे, प्रा. युवराज धसवाडीकर, मन्सूरभाई खान, अंनवर भाई शेख, सादिक पटेल, परवेजभाई सय्यद, समता आदींची प्रमुख उपस्थिती होती

## हारुणभाई इनामदार व चंद्रकांत खरात यांच्या संयुक्त बैठकीत पृथ्वीराज साठे यांना निवडून आणण्याचा संकल्प

केज/प्रतिनिधी :–महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ भीमशक्ती संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी प्रचार दौरा केला आहे.



भीमशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत हांडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ भीमशक्ती संघटनेचा संघटक चंद्रकांत खरात सर कार्यकर्त्यांना सोबत घेऊन ठिकठिकाणी ग्रामीण भागात जाऊन नागरिकांशी संवाद साधून पृथ्वीराज साठे यांना मतदान करा असे आवाहन करत आहेत. तसेच जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व भीमशक्ती संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी संयुक्त बैठक घेतली व पृथ्वीराज साठे यांना निवडून आणण्याचा संकल्प करण्यात आला आहे. दलित समाज बांधवांना विनंती केली पृथ्वीराज साठे हे गोरगरीब जनतेच्या कामाला येणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे त्यांना निवडून दिल्यावर गोरगरिबांच्या प्रश्नावर नक्कीच आवाज उठवणार व गोरगरिबाची कामे मार्गी लावतील असे नागरिकांना समजावून सांगून चंद्रकांत खरात सर व त्यांचे कार्यकर्ते संपूर्ण मतदारसंघांमध्ये फिरून मतदारांना विनंती करून मतदान करण्याचे आवाहन करत आहेत.

## केज विधानसभा मतदारसंघात शेवटच्या टप्प्यात साठेंनी बाजी मारली



केज/प्रतिनिधी:–केज राखीव विधानसभा मतदारसंघांमध्ये विद्यमान भाजपाच्या आमदार नमिता मुंदडा आणि शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीचे महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे या दोघांमध्ये सरळ फाईट होईल. पहिल्यापासून भाजपाच्या उमेद्वाराचा विरोध आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना मिळत असलेली सहानुभूती मतदार संघात भाकरी फिरवेल असे शेवटच्याटप्प्यात दिसून येत आहे. विद्यमान आमदार त्यांचे पती आणि सासरे यांच्या बाबत कार्यकर्ते मतदारांमध्ये प्रचंड असंतोष आहेत. त्यामुळे या वेळची निवडणूक त्यांच्यासाठी सहज राहणार नाही. दुसरीकडे पृथ्वीराज साठे यांची बाजू कमजोर वाटत असताना शेवटच्या टप्प्यात जरांगे पाटील यांनी उमेदवार द्यायचा नाही अशी भूमिका घेतल्यानंतर जरांगे यांच्याकडून उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या संगीता ठोंबरे सीता ताई बनसोड यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. याचा फायदा नक्कीच पृथ्वीराज साठे यांना होईल. त्याचबरोबर या मतदारसंघात इतर अपक्षांसह २३ उमेदवार उभे असून हे सर्व उमेदवार विद्यमान आमदार नमिता मुंडा यांचीच डोकेदुखी वाढवतील असे आज तरी चित्र दिसून येत आहे. आज या मतदारसंघात जाती–पातीच्या राजकारण बाजूला ठेवून केज नगरपालिकेच्या नगराध्यक्ष सिताताई बनसोड गटनेते हारुणभाई इनामदार यांनी केज शहरात प्रत्येक वार्ड पिंजून काढला आहे, सर्व सामान्य नागरिकांतून महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना पाठिंबा दर्शविला जात आहे,

## विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी संपली;

### पृथ्वीराज साठे व नमिताताई मुंदडा यांच्यात चुरशीची लढत

केज/प्रतिनिधी–विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी संपली असून आता उमेदवारांचा कॉर्नर बैठका सह गाठीभेटीवर भर राहणार असून केज विधानसभेची निवडणूक पृथ्वीराज साठे व नमिताताई मुंदडा यांच्यात चुरशीची लढत पाहावयास मिळाली आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, दिनांक १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी संपली असून प्रचारामध्ये एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यात आले. केज विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणामध्ये महाविकास आघाडी, महायुती महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या उमेदवारसह अपक्ष उमेदवार असे एकूण २५ उमेदवार या निवडणुकीच्या रिंगणात होते. शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी केज, अंबाजोगाई येथे भव्य सभा घेऊन पृथ्वीराज साठे यांना विजयी करण्यासाठी त्यांची ताकद पूर्णपणे कामाला लावली आहे. पृथ्वीराज साठे यांना विजयी करण्यासाठी खासदार बजरंग बप्पा सोनवणे, खासदार रजनीताई पाटील, अशोकराव पाटील, जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाईभाई इनामदार, केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड माजी आमदार संगीताताई ठोंबरे, डॉ. अंजलीताई घाडगे यांच्यासह महाविकास आघाडी व घटक पक्षाचे नेत्यांनी कंबर कसून पृथ्वीराज साठे यांना निवडून आणण्यासाठी काम केले आहे. भाजपच्या तथा महायुतीच्या उमेदवार नमिताताई मुंदडा यांनी मागील पाच वर्षामध्ये मतदार संघामध्ये केलेल्या विकास कामाच्या जोरावर मतदार संघातील गावोगावात जाऊन मतदारांशी संवाद साधून प्रचार केला आहे तर त्यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा यांनी प्रचाराची एक हाती धुरा घेऊन मतदार संघ पिंजून काढला. नमिताताई मुंदडा यांच्या विजयासाठी वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी सभा घेऊन त्यांना विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले तर भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांनी केज मतदार संघामध्ये सभा, कॉर्नर बैठका घेऊन कार्यकर्त्यांना विनंती करून नमिताताई मुंदडा यांना विजयी करण्यासाठी पंकजाताई मुंडे व प्रीत ताई मुंडे या दोन्ही बहिणीने केज मतदार संघ पिंजून काढून कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे,महायुतीच्या उमेदवार नमिताताई मुंदडा नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश गालफडे यांच्या तिरंगी लढत होईल असे अपेक्षित होते परंतु केज विधानसभा मतदार संघामध्ये मनसेचे उमेदवार रमेश गालफाडे यांचा फारसा जनसंपर्क नसल्याचे दिसून आले. मनसेचे जिल्हाध्यक्ष सुमंत धस यांचे होम पिच असलेल्या केज मतदार संघामध्ये फारसा त्यांचाही जनसंपर्क आढळून आला नाही प्रचारांमध्ये मनसेचे इंजन पिछाडीवर असल्याचे मतदारातून चर्चा ऐकण्यास येत आहेत. रमेश गालफाडे यांना विजयी करण्यासाठी त्यांच्या पक्षाच्या मोठ्या एखाद्याही नेत्याची सभा केज मतदार संघामध्ये झाली नाही व त्यांचे



प्रचार यंत्र नाही मोठ्या प्रमाणात मतदार संघामध्ये फिरताना दिसून आलेली नाही असेही जनसंमान्यातून बोलले जात आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत विजयी कोण होणार याविषयी अनेक दिग्गजा मधून तर्कवितर्क लावले जात आहेत परंतु निवडणुकीच्या प्रचाराचा व विजयाचा खरा अंदाज कोणासही लागला नाही पृथ्वीराज साठे व नमिता मुंदडा यांच्या चुरशीची लढत चे चित्र प्रचारामध्ये पाहावयास मिळाले आहे

# शांततामय वातावरणात मतदानासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज– जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे

## २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत करता येणार मतदान



लातूर :– विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. १०६ उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. मतदान प्रक्रिया शांततामय आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा, पोलीस प्रशासन सज्ञ झाले आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रलोभनाला अथवा दबावाला बळी न पडता निर्भयपणे आपला मतदानाचा अधिकार बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज येथे केले.
विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा प्रचार सोमवारी सायंकाळी ६ वाजता संपला असून या कालावधीनंतर आदर्श आचारसंहितेचा भंग होवू नये, यासाठी भरारी पथके, स्थिर निगारणी पथके अधिक गतीने कार्यरत करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील २ हजार १४२ मतदान केंद्र आणि १ सहाय्यकारी मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया होणार असून यासाठी २ हजार ३८३ मतदान पथके सज्ञ करण्यात आली आहेत. प्रत्येक मतदान पथकामध्ये मतदान केंद्राध्यक्ष, प्रथमस्तरीय मतदान केंद्र अधिकारी आणि दोन इतर मतदान केंद्र अधिकारी यांचा समावेश असून एकूण ९ हजार ५३४ अधिकारी, कर्मचारी या मतदान पथकांमध्ये राहतील. यासोबतच पोलीस, गृहरक्षक दल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांच्या मदतीसाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपलब्ध राहणार आहेत. तसेच प्रथमोपचार कीटसह एक आरोग्य कमर्चारी यांचीही मतदान केंद्रावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले.
भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सर्व मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, व्हीलचेअर, सावलीसाठी मंडप, वयोवृद्ध, गरोदर महिला यांना बसण्यासाठी खुर्ची यासारख्या किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सहाही विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी एक युवा संचलित मतदान केंद्र, दिव्यांग संचलित मतदान केंद्र, महिला संचलित मतदान केंद्र तयार करण्यात आले आहे. यासोबत प्रत्येक मतदारसंघात एक अभिनव मतदान केंद्र (युनिक पोलिंग स्टेशन) तयार करण्यात आले आहे. वयोवृद्ध मतदार, गरोदर महिला यांना रांगेत उभे न करता प्रथम प्राधान्याने प्रवेश देवून त्यांचे मतदान करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले.
निवडणूक, मतदानविषयक तक्रारींसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून या कक्षाचा संपर्क क्रमांक ०२३८२–२२४४७७ आहे.
मतदानासाठी ओळखीचा पुरावा म्हणून १२ कागदपत्रे ग्राह्य धरणार
मतदारांनी मतदानासाठी येताना भारत निवडणूक आयोगाने दिलेले मतदार ओळखपत्र सोबत आणावे. मतदान ओळखपत्राशिवाय आणखी १२ कागदपत्रे ग्राह्य धरण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक अथवा पोस्ट ऑफीसने जारी केलेले छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र अथवा राज्य सरकार किंवा सार्वजनिक उपक्रम अथवा पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदारांना अथवा आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र आदी ओळखपत्रांचा समावेश आहे.
मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश; मोबाईल वापरावर बंदी, जिल्ह्यात जमावबंदी लागू
विधानसभा निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यात ज्या ठिकाणी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे, त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने उभारणे, तसेच मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेंजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बाळगण्यास तसेच निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हाचे प्रदर्शन व निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश करण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी करण्यात आले आहेत.
आठवडी बाजार राहणार बंद
विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदानानिमित्त जिल्ह्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिले आहेत. लातूर तालुक्यातील मुरुड, टाकळी शी., औसा तालुक्यातील नागरसोगा, उजनी, रेणापूर तालुक्यातील खरोळा, निलंगा तालुक्यातील लांबोटा, कासार सिरसी, पानचिंचोली, हलगरा, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शिरूर अनंतपाळ, उदगीर तालुक्यातील वाढवाणा बु., अहमदपूर तालुक्यातील किनगाव, चाकूर तालुक्यातील चापोली आणि देवणी तालुक्यातील देवणी बु. या ठिकाणी होणारे आठवडी बाजार २० नोव्हेंबर २०२४ ऐवजी इतर दिवशी भरविण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.
शांततामय वातावरणातील मतदानासाठी कडेकोट बंदोबस्त
विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदान शांततेत पार पडण्यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये १३९ पोलीस अधिकारी ४ हजार ४३० पोलीस अंमलदार, होमगार्ड आणि केंद्रीय सशस्त्र दलाच्या ६ तुकड्या आणि एक राज्य राखीव दलाची तुकडीही तैनात करण्यात आल्या आहेत. मतदान प्रक्रियेत गुन्हेगारांकडून कोणताही व्यत्यय येवू नये, यासाठी ३ हजार १७९ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. यामध्ये ६ जण तडीपार आणि ४ जणांना स्थानबद्ध करण्यात आले आहे. आतापर्यंत ४२ लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ३७ लाख रुपयांचे मद्य, ४७ लाख रुपये किंमतीचा गांजा जप्त केल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले. तसेच मतदारांना कोणतीही तक्रार असल्यास ११२ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले.
मतदान, मतमोजणीदिवशी मद्यविक्री राहणार बंद
लातूर जिल्ह्यात मतदान कालावधी संपण्याच्या ४८ तास अगोदरपासून ते मतदान संपेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी संपेपर्यंत जिल्ह्यातील मद्यविक्री पूर्णत: बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांनी दिले आहेत. निवडणूक कालावधीत मतदान संपण्याच्या वेळेपूर्वी ४८ तासापासून म्हणजेच १८ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या सायंकाळी ६ वाजेपासून, मतदानापूर्वीचा एक दिवस म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी पूर्ण दिवस आणि २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत मद्यविक्री बंद राहील. तसेच मतमोजणी निमित्त २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत मद्यविक्री बंद राहणार आहे.
राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर; कामगारांना मिळणार एका दिवशीची सुट्टी अथवा सवलत

# उदगीरात पायलटचे प्रशिक्षण केंद्र करणार : क्रीडामंत्री संजय बनसोडे



उदगीर / प्रतिनिधी :– उदगीर मतदार संघातील तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे यासाठी माझा प्रयत्न असून मोठ्या उद्योजकांनी उदगीरला येऊन गुंतवणूक करावी यासाठी उदगीर परिसरात विमानतळ उभारण्यासाठी आपण पुढाकार घेतला आहे. या विमानतळाच्या उभारणीसोबतच या परिसरात पायलटचे प्रशिक्षण केंद्रही उभारणार असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी दिली.
उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार मंत्री संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ नाईक चौक येथे प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.
यावेळी , माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, बस्वराज बागबंदे, उषा कांबळे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, शिवसेनेचे नेते ॲड. गुलाब पटवारी, समीर शेख, सय्यद जानीमियाँ, डॉ. प्रकाश येरमे, अमोल पाटील कौळखेडकर, बापूराव यलमटे, प्रकाश राठोड, चंद्रसेन मोहिते, दीपाली औटे, सुधीर भोसले, उदय ठाकूर, डॉ. चंद्रकांत कोठारे, राजकुमार भालेराव, विलास शिंदे, राहुल रतीकांत अंबेसंगे, अजित राठोड, रामदास बेंबडे, महेश मळगे आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.
यावेळी बोलताना ना. संजय बनसोडे म्हणाले की, नाईक चौकातील आजची ही रेकॉर्ड ब्रेक सभा पाहता विजय निश्चित आहे, तरीही महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गाफील राहू नये असे आवाहन करून ना. बनसोडे म्हणाले की, गेल्या पाच वर्षात मतदारांनी दिलेल्या आशीर्वादाच्या जोरावर उदगीर मतदार संघात मोठा बदल घडवून आणला आहे. आगामी काळात आणखी बरीच विकास कामे करून या मतदारसंघाला हरित शहर, सुंदर शहर करुन एक विकासाचे मॉडेल बनविण्यासाठी आपला प्रयत्न राहणार असून मतदारांनी आपली शक्ती माझ्या पाठिशी उभी करावी असे आवाहनही यावेळी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी केले आहे. यावेळी बोलताना जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी ना. संजय बनसोडे यांना नक्कीच ऐतिहासिक विजय मिळणार आहे असा विश्वास व्यक्त करून उदगीर शहरातील निजामकालिन शासकीय इमारतीचे रुपडे बदलण्याचे काम ना. बनसोडे यांनी केले आहे. उदगीर मतदार संघातून माजी आमदार सुधाकर भालेराव दोनदा आमदार झाले. पण या काळात एकही काम केले नाही पण आज खोटे बोल पण रेटून बोल असे त्यांचे काम चालू आहे अशी टीका करून विकासाचा महामेरू म्हणून ना. बनसोडे यांच्याकडे बघितले जात आहे असे ते म्हणाले. ही निवडणूक सत्य व असत्याची निवडणूक आहे. विरोधी पक्षाचे उमेदवार जातीवाद करीत आहेत तसे न करता त्यांनी विकासावर बोलावे असे आवाहन त्यांनी विरोधकांना केले. प्रत्येक जातीधर्माला सोबत घेऊन जाणारा, दूरदृष्टी असणारा नेता म्हणजे ना. संजय बनसोडे आहेत. त्यांचे नेतृत्व जपण्याची गरज असल्याचेही यावेळी राहुल केंद्रे म्हणाले.

# महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ बाबुराव पोटभरे यांची जाहीर सभा संपन्न

## केज मतदार संघाला लागलेली कीड काढून टाका–बाबुराव पोटभरे



केज/प्रतिनिधी–महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ बाबुराव पोटभरे यांची केज शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे जाहीर सभा संपन्न झाली आहे. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा दिल्यापासून मतदार संघामध्ये जाऊन अनेक ठिकाणी कॉर्नर बैठका घेऊन व केज शहरात प्रचार रॅली काढून पृथ्वीराज साठे यांना विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले आहे. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी पृथ्वीराज साठे यांना विजयी करण्यासाठी दलित चळवळीतील सर्व संघटना व नेते एकत्रित करून पृथ्वीराज साठे यांना विजयी करण्यासाठी प्रचार कामी लावले याचाच एक भाग म्हणून आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते बाबुरावजी पोटभरे यांचा देखील पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा काही दिवसापूर्वीच दिला होता. बाबुराव पोटभरे यांनी जाहीर पाठिंबा दिल्यानंतर केज मतदार संघामध्ये त्यांचे कार्यकर्ते कामाला लावले होते व त्यांनी पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ केज येथे जाहीर सभा घेतली. या जाहीर सभेमध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नेते बाबुरावजी पोटभरे म्हणाले की,केज मतदार संघाला गेल्या ३० ते ३५ वर्षापासूनची लागलेली कीड काढून टाका व पृथ्वीराज साठे यांना भरभरून मतांनी निवडून द्या. पुढे बोलताना पोटभरे म्हणाले की, स्व. विमलताई या माझी बहिण होत्या अक्षय माझा भाचा आहे परंतु मला माझ्या समाजावर झालेल्या अन्यायच्या विरोधात त्यांनी केव्हाच आवाज उठवला नाही आणि समाजाचा विकासही केला नाही त्यामुळे यापुढे पृथ्वीराज साठे यांना दलित समाज बांधवासह मराठा, मुस्लिम, साळी,माळी,कोळी या समाजासह आठरा पगड जातीतील समाज बांधवांनी यावेळी पृथ्वीराज साठे यांनाच निवडून का द्यायचे तर पृथ्वीराज साठे हे प्रत्येकाच्या अडचणीला धावून येणारा कार्यकर्ता आहे तो गरीबाचा मुलगा आहे म्हणून त्यांना गरिबाची जाण आहे असे बोलताना बाबुराव पोटभरे यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सीताताई बनसोड यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करून पृथ्वीराज साठे यांना भरघोस मताने निवडून द्या असे उपस्थितांना आवाहन केले आहे.

# ना.संजय बनसोडे यांच्या शहरातील पदयात्रेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ना. संजय बनसोडे यांना निवडून देणार असल्याची मतदारांची ग्वाही

**दरम्यान सकाळी ६ वाजता ना. संजय बनसोडे यांनी श्री शंकरलिंग महाराज मठ येथे जाऊन सद्गुरूंचे दर्शन घेतले.**





उदगीर / प्रतिनिधी :– उदगीर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण भागात प्रचारात आघाडी घेतली आहे. काल उदगीर शहरातील आडत लाईन व शहरातील मुख्य रस्त्यावरून नामदार संजय बनसोडे यांची प्रचार रॅली निघाली होती. यावेळी शहरातील व्यापाऱ्यांनी क्रीडामंत्री संजय बनसोडे यांचे फटाके फोडून शाल व पुष्पहार देऊन सत्कार करुन नामदार संजय बनसोडे यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. गेल्या पाच वर्षात उदगीर जळकोट मतदार संघाचा कायापालट करणारे विकासरत्न आमदार म्हणून संजय बनसोडे यांनी सबंध महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण केली आहे. जनतेच्या हाकेला धावून जाणारे नामदार संजय बनसोडे खऱ्या अर्थाने सर्वसामान्य, वंचित व कष्टकऱ्यांचे नेते असून त्यांच्यावर सर्व स्तरातील नागरिकांनी प्रेम केले असुन जनतेच्या मनातले आमदार म्हणून ते गेल्या पाच वर्षापासून काम करत आहेत. राज्याचे कॅबिनेट मंत्रीपद असतानाही जमिनीवर असणारा नेता म्हणून नामदार संजय बनसोडे यांची ओळख आहे ते काल निघालेल्या रॅलीतून नागरिकांनी दाखवून दिले आहे. ना.संजय बनसोडे यांच्या प्रचारासाठी उदगीर शहरातील आडत मार्केट यार्डातुन पदयात्रा व रॅलीची सुरूवात ढोलताशांच्या गजरात सुरुवात केली. यावेळी ना.संजय बनसोडे यांनी व्यापा–यांच्या भेटी घेवुन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी व्यापा–यांनी ना.बनसोडे यांचे जंगी स्वागत केले. यावेळी पदयात्रा आडत मार्केट ते गणेश मंदिर जय जवान चौक ते मधुबन हॉटेल ते हनुमान कट्टा ते आर्य समाज ते चौबारा ते पोलीस स्टेशन ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, बस्वराज बागबंदे, उषा कांबळे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे,इंजि.विश्वजित गायकवाड, रामराव बिरादार, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, अनिल मुदाळे, नरसिंग शिंदे, श्याम डावळे, मनोज पुदाले, सुधीर भोसले, भरत चामले, समद शेख, शफी हाशमी, सुदर्शन मुंडे, विजय निटुरे, उत्तरा कलबुर्गे, वर्षा कांबळे, दिपाली औटे, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, हुसना बानो, रविप्रभा खादीवाले , प्रीती कौतीकवार, मुकेश भालेराव, पप्पु गायकवाड, फय्याज शेख, कैलास पाटील, कुणाल बागबंदे, जितेंद्र शिंदे, बाबासाहेब सुर्यवंशी, बबलु मुळे, अझहर मोमीन, इब्राहिम देवर्जनकर, सतिश कांबळे, राजकुमार गंडारे , राजकुमार चव्हाण, महेश बिरादार, आदीसह राष्ट्रवादी कॉंग्रेस व भाजपा, शिवसेना, रिपाई व घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE